**लोकमत इन्फोग्राफिक्स**



भुयारी मेट्रो ३

# गिरगावसह काळबादेवीही सुसाट

**लोकमत न्यूज नेटवर्क । मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनकडून कुलाबा - वांद्रे - सीप्झ या देशातील पहिल्या वहिल्या भुयारी मेट्रो ३ चे काम सुरू असून, कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजीतसिंह देओल, प्रकल्प संचालक सुबोध गुप्ता व प्रणाली विभागाचे संचालक अजय भट्ट यांनी या प्रकल्पाची पाहणी केली. यावेळी यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, काळबादेवी व गिरगाव मेट्रो स्थानकांना भेटी दिल्या. यावेळी कामाचा आढावा घेत कामाबाबत समाधान व्यक्त करत, सुरक्षितता जपत कामाची गती कायम ठेवा, असे निर्देश दिले.

मेट्रो ३ चे काम वेगाने सुरू असून, स्टेबलिंग लाइनसाठी पहिल्या ट्रॅकचे काम कफ परेड येथे सुरू झाले आहे.

**७१.५० टक्के**

भुयारी मार्ग प्रकल्पाचे एकंदरित काम

| | |
|---|---|
| **८२ टक्के** स्थापत्य कामे | **३४ टक्के** प्रणालीविषयक कामे |
| **७९ टक्के** स्थानकांची कामे | **९७ टक्के** प्रकल्पाचे एकूण भुयारीकरण पूर्ण |

## आझाद मैदानातील जागेला मुदतवाढ

या प्रकल्पाकरिता आझाद मैदानातील ३० हजार ७७६ चौरस मीटर जागा पुढील तीन वर्षांकरिता तात्पुरत्या स्वरूपात वापरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

## स्थानके :

**८० टक्के काम पूर्ण**

- एम.आय.डी.सी
- सीप्झ
- विधान भवन
- मरोळ नाका
- कफ परेड
- सिद्धिविनायक
- चर्चगेट
- हुतात्मा चौक
- मुंबई सेंट्रल
- आंतरराष्ट्रीय विमानतळ

**१०० टक्के**

९ स्थानकांचे तिन्ही स्लॅबचे बेस स्लॅब, कॉंकोर्स स्लॅब आणि रुफ स्लॅब १०० टक्के बांधकाम पूर्ण झाले.



**२२ टक्के**

रुळ बांधणीचे काम पूर्ण झाले.